गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३५४ वा ● बुधवार १५ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 354 | Date : 15/05/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## मान्सूनपुर्व सर्व कामे संबधित यंत्रणांनी वेळेत पुर्ण करावीत : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

### मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक;आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा

**सोलापूर/प्रतिनिधी:**

मान्सून काळात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी संबधित यंत्रणांनी योग्य ती खबरदारी घेवून मान्सून पूर्व कामे वेळेच्या आत पुर्ण करावीत. तसेच मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज व अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मान्सूनपूर्व आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, रो.ह.यो.उपजिल्हाधिकारी चारूशीला देशमुख,जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा कृषी अधिक्षक दत्तात्रय गावसाने ,आपत्ती वय्वस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त् संदिप कारंजे, महावितरणचे कार्य.अभियंता संजय पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले ,जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, मुख्य अग्निशमन अधिकारी केदार आवटे, यांच्यासह जिल्ह्यातील प्रातांधिकारी, तहसिलदार तसेच संबधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, जिल्ह्यातील मोठे व मध्यम तसेच सर्वच प्रकल्पाची तातडीने दुरुस्ती । पान २ वर



## मनोज जरांगे पाटील ४ जूनपासून पुन्हा उपोषणाला बसणार

**संभाजी नगर/दैनिक यशसिध्दि न्यूज** : मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मागील काही महिन्यांपासून लढा देणारे मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा बेमुदत उपोषण करणार असल्याचे त्यांनी आज माध्यमांशी बोलताना सांगितलं. तसेच त्यांच्या उपोषणाची सुरुवात ४ जून रोजी म्हणजेच लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी होईल, अशी माहितीही त्यांनी दिली. महत्त्वाचे म्हणजे राज्य सरकारने दिलेल्या १० टक्के आरक्षणाचा मराठा समाजाला कोणताही फायदा होत नसल्याचा आरोपही त्यांनी यावेळी बोलताना केला.

माझा हा लढा मराठा समाजाला न्याय देण्यासाठी आहे. मी ४ जूनपासून पुन्हा बेमुदत उपोषण करणार आहे. मुळात सर्वच पक्षात मराठा समाजाचे नेते आहेत. मराठा कोणताही असला तरी त्याला राज्य सरकारने दिलेल्या १० टक्के आरक्षणाचा कोणताही फायदा झालेला नाही. यामध्ये भाजपातील गरीब मराठा समाजाच्या मुलांचंही नुकसान झाले आहे. सरकारने १० टक्के आरक्षण दिलं आहे, पण ते अजूनही लागू झालेलं नाही, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

पुढे बोलताना ते म्हणाले, ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल असला, तरी सकाळी ९ वाजता माझ्या उपोषणाची सुरुवात होईल. जनतेचा आशीर्वाद माझ्या पाठिशी आहे. सहा कोटी मराठा समाजाचा आशीर्वाद माझ्या पाठिशी आहे.

दरम्यान, या उपोषणाच्या पार्श्र्वभूमीवर मराठा समाजाला काय आवाहन कराल, असं विचारलं असता, मला आता समाजाला आवाहन करण्याची गरज वाटत नाही. मराठा समाजाला आता सगळं माहिती आहे. एका मुलाप्रमाणे ते माझी काळजी घेतात. माझे उपोषण सुरु झाल्यानंतर मराठा समाज गावोगावी शांततेत आंदोलन करतील, असा मला विश्र्वास आहे, असे ते म्हणाले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वाराणसीतून दाखल केला उमेदवारी अर्ज

**वाराणसी/दैनिक यशसिध्दि न्यूज** लोकसभा निवडणुकीच्या एकूण सात टप्प्यांपैकी चार टप्प्यांमधील मतदान पार पडलं आहे. आता पाचव्या टप्प्यासाठी येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा वाराणसी लोकसभा मतदारसंघामधून लोकसभा निवडणूक लढवत आहेत. त्या पार्श्र्वभूमीवर मोदी यांनी आज त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्जासह मोदींनी त्यांचं प्रतिज्ञापत्रदेखील सादर केलं आहे, ज्यामध्ये त्यांच्या संपत्तीविषयीची माहिती देण्यात आली आहे. या प्रतिज्ञापत्रातील माहितीनुसार मोदींकडे स्वतःचं घर नाही. तसेच त्यांच्या नावावर कोणतंही चारचाकी वाहन नाही.



पंतप्रधान मोदींकडे एकूण ५२,९२० रुपयांची रोकड आहे. तसेच गांधीनगरमधील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत त्यांचं खातं असून या खात्यात ७३,३०४ रुपये आहेत. तसेच भारतीय स्टेट बँकेच्या वाराणसी शाखेतही । पान २ वर

## धीरज वाधवान यांना सीबीआयकडून अटक

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

डीएचएफएलचे माजी संचालक धीरज वाधवान यांना सीबीआयने अटक केली आहे. त्यांच्यावर ३४ हजार कोटी रुपयांच्या कथित बँक फसवणुकीचे आरोप आहेत. अटकेनंतर त्यांना आज दिल्लीतील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याची माहिती सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिली. 'द फायनान्शियल एक्स्प्रेस'ने दिलेल्या वृत्तानुसार, सोमवारी सायंकाळी धीरज वाधवानला यांना मुंबईतून ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर आज त्यांना दिल्लीतील विशेष । पान २ वर



## नरेंद्र मोदी तुम्ही कितीवेळा नवरदेव. पुन्हा येईल, पुन्हा येईल, बस्स झालं : उध्दव ठाकरे

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि महाराष्ट्रातील शेवटच्या टप्प्यासाठी २० मे रोजी मतदान पार पडणार आहे. त्यामुळे प्रचारासाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिल्यामुळे प्रचाराला वेग आला आहे. आज महाविकास आघाडीची पालघर लोकसभा मतदारसंघात भारती कामडी यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. नरेंद्र मोदी तुम्ही कितीवेळा नवरदेव. पुन्हा येईल, पुन्हा येईल, बस्स झालं, अशी खोचक टीका उद्धव ठाकरे यांनी मोदींवर केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मुंबईत बुधवारी रोड-शो होणार आहे. त्यांच्या या रोड शो ची जय्यत तयारी करण्यात आली आहे. यावरूच आता उद्धव ठाकरे यांनी मोंदीवर टीका केली आहे. ते म्हणाले, महाराष्ट्राने पंतप्रधान मोदी यांना आताच रस्त्यावर आणलं आहे. त्यामुळे ४ जूनला काय होतं ते पाहा. मोदी उद्या मुंबईत येणार आहेत. ते विमानाने मुंबईत येतील. मग विमानतळ बंद करतील. तुम्ही प्रधानसेवक असाल तर रेल्वेने फिरा. सर्व । पान २ वर

## मतदार यादीत नाव वगळलेल्यांना भरावा लागेल फॉर्म नंबर सहा

**सोलापूर/प्रतिनिधी :**

मतदार यादीत नावच नसल्याने किंवा जिवंत असूनही मतदार यादीत मयत म्हणून नोंद झाल्याने अनेकांना या लोकसभा निवडणुकीत मतदान करता आले नाही. आता अशा मतदारांना ४ जूननंतर 'वोटर हेल्पलाइन'वर फॉर्म नंबर सहा भरून द्यावा लागणार आहे. त्यानंतरच त्या मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट होणार आहेत.सोलापूर व माढा लोकसभा या दोन्ही लोकसभा मतदारसंघातील अनेकांना ७ मे रोजी मतदान करता आले नाही. मतदारांकडे मतदार ओळखपत्र आहे, मागच्यावेळी मतदान केले, पण यंदा यादीत नावच नव्हते. दुसरीकडे अनेकांना मी जिवंत आहे, तुमच्यासमोर उभा असलेला तो मीच आहे, असे ठणकावून सांगावे लागले.मात्र, नियमानुसार त्यांना मतदानाचा हक्क बजावता आला नाही. अशा शेकडो मतदारांना मतदान न करताच परतावे लागल्याचे ७ मे रोजी पाहायला मिळाले. तसे आरोप देखील । पान २ वर

## अक्कलकोट पाणी प्रश्नी रिपाई घागर मोर्चा काढण्याच्या तयारीत

### रिपाईच्या वतीने टँकर सुरू करण्याची मागणी

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

शहराला नियमित पाणीपुरवठा होत नसल्यामुळे अक्कलकोट शहरामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्यावतीने करण्यात आली आहे. नगरपरिषदेने पाण्याचा प्रश्र्न न सोडवल्यास लवकरच घागर मोर्चा काढण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.नगरपरिषद घरपट्टी,पाणीपट्टी खुबीने वसूल करते त्यांना सुविधा देण्यास काय अडचण आहे. दोन वर्षापासून नगरपरिषदेत नगरसेवक नाहीत.संपूर्ण कारभार प्रशासकावरती सुरू आहे. कोण कोणाला विचारायला तयार नाही अशा स्थितीमध्ये शहराची पाणीपुरवठ्याची व्यवस्था कोलमडलेली आहे.सध्या शहराला आठ ते नऊ दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे.हे कधी थांबणार आहे.वरचेवर शहरामध्ये पाण्याची परिस्थिती बिकट होत चालली आहे.आज नागरिकांना टँकरद्वारे पाणी विकत घेऊन आपले दैनंदिन जीवन जगण्याची पाळी आली आहे.पाण्याच्या टँकरचे दर गगनाला भिडले आहेत ते गोरगरिबांना न परवडणारे आहेत. हजार लिटरच्या टँकरला पाचशे रुपये द्यावे लागत आहे.एक तरी आठ दिवसातून पाणी येते आणि आल्यावर गोरगरीब जनतेला काम सोडून पाणी भरावे लागत आहे.गेल्या दीड महिन्यापासून रिपब्लिकन पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी,प्रांत अधिकारी यांच्याकडे टँकर सुरू करण्याची मागणी केली आहे.याची दखल न घेतल्यास अक्कलकोट शहराच्या सर्व भागातील नागरिकांना घेऊन अक्कलकोट नगरपरिषद वरती घागर मोर्चा काढणार असल्याची माहिती रिपाइं तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.



## अक्कलकोटमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

वीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा समितीचे आधारस्तंभ अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक अध्यक्ष अतिश पवार यांच्या वतीने राजा शिवछत्रपती शिवाजी महाराज चौक,एस-टी स्टँड येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीस आधारस्तंभ नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण,पुजन करुन मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी उपनगराध्यक्ष .यशवंत तात्या धोंगडे,अल्पसंख्याक सोलापूर जिल्हाध्यक्ष - नन्नू(भाई)कोरबू,भा.ज.पा.तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड,आर.पी.आय. तालुकाध्यक्ष-.अविनाशजी मडीखांबे,भा.ज.पा .शहर अध्यक्ष-शिवशरण जोजन, राठा समाजाचे नेते-मनोज निकम ,नगरसेवक .विनोद मोरे,राजा छत्रपती शिवाजी महाराज चौक संस्थापक अध्यक्ष तम्मा(मामा)शेळके, अतुल जाधव, इंजि. वरुण शेळके, सुहास सुरवसे,वडार समाज तालुका अध्यक्ष अंकुश चौगुले,प्रहार संघटना अध्यक्ष अमर सिरसाट,.ऋषिकेश लोणारी,राजाभाऊ नवले,शितल फुटाणे,अभिषेक लोकापुरे, केदार माळशेट्टी,सिध्दु माळी,देविदास गवंडी,प्रथमेश पवार,राहुल वाडे, हुसेन बळोरगी, शरद भोसले,प्रसाद मोरे,प्रसन्न गवंडी, आकाश सुर्यवंशी,अनंत क्षीरसागर,अमोल सुरवसे, विकास पवार,.निशांत निंबाळकर,.संतोष श्रीमान साहेब,अजय शिंदे,समर्थ शिंदे,दिनेश पाटील, उत्सव अध्यक्ष-आनंद(छोटू)पवार, उपाध्यक्ष-शेखर वाले,गणेश पाटील,सचिव-.वैभव मोरे,.आबा सूर्यवंशी,.शुभम धुमाळ,सहसचिव-अमित कोळी,.बसवराज भोळे,कार्याध्यक्ष-भरत राजेगांवकर,रवि पोळ,ओंकार जाधव,उपकार्यध्यक्ष-.सचिन बिराजदार,आकाश चौगुले,उत्सव खजिनदार-.लक्ष्मण शिंदे,.राजाराम पवार,पुजा प्रमुख-.शरणू किणीकर,निखील शिंदे, शशांक सुरवसे,प्रज्वल पोतदार,प्रसाद चव्हाण,अंबादास शिंदे,संकेत बिराजदार,किशोर ढंगे,स्टेज प्रमुख-सिध्दु लव्हारे,प्रशांत बंदिछोडे,श्रीशैल हळीमनी,समर्थ कलशेट्टी,युवराज तानवडे,प्रसिद्धी प्रमुख:-अभिषेक चव्हाण,दत्ता मोरे,समर्थ नडगिरे,ओंकार दुरगकर,रुषी चव्हाण, गणेश पवार, अजय वांजरे, विष्णू गुंठे, सोमनाथ शिंदे, शिवशंभूभक्त यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होते.



## संपादकीय

### तरच परिवर्तन होईल. ..

मतदानाचे वय २१ वर्षावरून १८ वर्षे करण्याची सगळ्यात महत्त्वाची आणि राजीव यांच्या कार्यकाळातील अखेरची घटनादुरुस्ती ठरली होती. आपल्या शेजारच्या चीनमध्ये मात्र अध्यक्ष शि जिनपिंग यांना घटनेनेच आजीवन कम्युनिस्ट पार्टीचा नेता म्हणजे पर्यायाने चीनचा अध्यक्ष राहण्याचा मान बहाल केला आहे. तशी घटनादुरुस्ती करून त्यांनी ते मिळवले आहे. आता रशियाचे व्लादिमीर पुतिनही २०३६ पर्यंत रशियाचे अध्यक्ष राहू शकणार आहेत. एका घटनादुरुस्तीमुळे पुतिन यांना हे शक्य होणार आहे. २०३६ मध्ये पुतिन ८३ वर्षांचे असतील आणि त्यांनी तोपर्यंत ते सत्तेत कायम राहिले तर स्टॅलिन यांना मागे टाकून ते रशियातले सगळ्यात जास्त काळ अध्यक्षपद भूषवलेले नेते असतील. हीच दोन देशांची कार्यपध्दती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भारतात आणायची आहे. म्हणून त्यांना पुन्हा एकदा सत्तेत यायचे आहे आणि देशाच्या घटनेला बदलून स्वतःला सर्वशक्तिमान नेता बनवून पुढील तीन दशके भारतावर राज्य करायचे आहे. एक देश एक निवडणूक या नवीन घटनादुरुस्तीच्या निमित्ताने त्यांना हा घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार प्राप्त होईल. मोदी पुन्हा सत्तेत आले की ते इलेक्टोरोल बाँडना अधिकृत करतील. जेणेकरून सरकार आणि सत्ताधारी राजकीय पक्ष यांना अधिकृतपणे खुलेआम मोठ्या कंपन्यांना धमकावून पैसे वसूल करण्याचा अधिकृत परवाना मिळेल आणि दुसरे एक देश एक निवडणुकीचा कायदा संमत करून घेतील. ज्यामुळे त्यांना देशाची लोकशाहीप्रणीत रचना बदलण्यास वाव मिळेल. एक देश एक निवडणूक ही अमेरिका, चीन आणि रशिया या देशातील लोकशाही पध्दती आहे. भारतात ती स्वीकारली गेली की सर्व निवडणुका म्हणजे पंचायत समिती, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, विधानसभा आणि लोकसभा एकत्रच घ्याव्यात असा घटनादुरुस्ती करून कायदा केला जाईल. सर्व अधिकार राष्ट्रपतींना बहाल केले जातील आणि राष्ट्रपतिपदाचा कालावधी हा किमान ३० वर्षांचा केला जाईल. ही घटनादुरुस्ती झाली की बहुमताच्या जोरावर मोदीच पुढील ३० वर्षे राष्ट्रपती होतील आणि देशाची संपत्ती अदानी आणि अंबानींच्या हवाली करून स्वतः भाइयों और बहनो करत भाषणे देत फिरतील. हे करण्यासाठीच त्यांना पुन्हा सत्ता हवी असून त्यांना घटनादुरुस्ती करायची आहे. म्हणून मोदींना मत म्हणजे भारताच्या संविधानिक रचनेला, लोकशाहीला तडा देण्यासाठी मत हे आपण ध्यानीमनी जपले पाहिजे. तर आणि तरच परिवर्तन होईल.

# समतेची वाणी वामनदादाची गाणी



वामनदादा हे फक्त नाव नाही तर प्रबोधनाची मशाल आहे, विचाराचे वादळ आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ, विचार व कार्य गावखेड्यातील घराघरात पोहचवण्याचे काम वामनदादा कर्डक यांनी केले. वामनदादा कर्डक यांच्या प्रत्येक रचनेमधुन, प्रत्येक विचारामधुन तथागत गौतम बुद्ध व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित समता दिसुन येते. आंबेडकरवादी चळवळ घराघरात पोहचवून चळवळीला इमानदार कार्यकर्ते वामनदादा यांनी तयार केले. वामनदादाची लेखणी समतेसाठी व भिम विचारासाठी येथे सतत झिजत होती. समता कुठे आहे याबद्दल वामनदादा लिहतात..

इथे नाही जातीयवाद ना पोकळ वर्णभेद
सर्वावरती करतो प्रिती माझा गौतम बुद्ध
दार खुले हे सर्वांना, शूद्रांना चांडाळांना
साळी, माही, ब्राह्मण कोळी। विलीन व्हारे त्रिसरणी
कुणीही यावे शुद्ध बनावे बुद्धाच्या चरणी

बुद्ध हा समस्त जगाचा समतावादी आहे म्हणून बुद्धांसमोर कोणताही भेद नाही. मानव म्हणून समतावादी जगायचे असेल तर बुध्दाचे विचारच आपणास एकत्र आणु शकतात म्हणून सर्वांनी बुद्धाजवळ यायला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य गाण्याच्या माध्यमातून लोकांच्या मनावर बिंबवण्याचे काम वामनदादा कर्डक यांनी केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित समता, बंधुता, एकी, सामाजिक न्याय वामनदादा कर्डक यांच्या साहीत्यात दिसून येते. वामनदादा यांचे साहित्य काव्य वाचताना आजही समाजाचे दृश्य डोळ्यासमोर उभे राहते. सर्वांनी एकतेने राहण्यासाठी दादा लिहतात...

सांगू किती मी दादा
एकतेने येथे नांदा
यारे सारे भाऊ भाऊ
एकतेने प्रेमभावे येथे राहु
तुटले दुवे हे सांधा
एकतेने येथे नांदा

आजही आपण बघितले तर आपण जयभीम जोरजोरात बोलतो परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संदेशाचे पालन करत नाही. सामाजिक आणि राजकीय पातळीवर एवढी बेकी आहे की एक व्हायला तयार नाहीत. उठसुठ कोणी उठतो आणि स्वतः चे दुकान थाटतो. परंतु अगोदरच असलेल्या बेकीचे एकीकरण करण्यासाठी कोणी च समोर येत नाही कींवा एकीकरणासाठी कोणी थोडे नमते घेऊन एकमेकांच्या हातात हात द्यायला तयार नाहीत. बेकी करून राहणारे लोकांमध्ये एक गोष्ट सारखी आहे ती म्हणजे डॉ बाबासाहेब यांचे नाव व दुसऱ्यांना सांगण्यासाठी विचार. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्वतः जगणारे लोक अपवादात्मक आहेत म्हणून दादा लिहतात...

भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते
वाणीत भीम आहे करणीत भीम असता
वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊ त्यांच्या नावाचे व विचाराचे भांडवल बनवून प्रत्येक जन स्वतः ची झोळी लाचार होऊन भरत आहेत. परंतु वामनदादा यांच्या मते पाच लोक एकत्रितपणे जरी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे असते तर आज आंबेडकरवादी चळवळ, लोकांचे स्थान, लोकांना सन्मान हा वेगळ्याच प्रकारचा असून विचाराचे लोक असतेच तर देशात वजन असते. परंतु फक्त वाणीतच भीमाला बंदिस्त करून कर्णीत भिम नसल्याने समाजाचे अतोनात नुकसान झाले आहे. असे वामनदादा ही सांगतात तरीही लोकांना विचाराचे व चळवळीचे गांभीर्य राहीले नाही. जो तो स्वतः ची दुकानदारी चालवण्यासाठी बेकी करून स्वतः संघटना काढतो व गावातही कोणी ओळखत नसलेला स्वतः लाच राष्ट्रीय नेता म्हणून घोषित करतो. म्हणून वामनदादा लिहतात.......

संघटना हजार झाल्या, नेते हजार झाले
कोणा म्हणावे आपुले चेहरे, हजार झाले
तु पाहीलेली स्वप्ने पुर्ण झालीत कारे?
भिमा तुझ्या मताची लोक मेलीत कारे?

दुकानदारी करून, स्वतः ला नेते समजणाऱ्या लोकांना वामनदादा बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे समजतच नाहीत. कारण स्वतः ची दुकानदारी चालावी म्हणून संघटना काढून अध्यक्ष होणारे लोक चळवळीची वाट लावतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकांमध्ये जो स्वाभिमान, सन्मान दिला होता तो स्वाभीमान, तो कणखर पणा आज लोकांमध्ये दिसत नाही कारण आज लोक स्वतः ची झोळी भरण्यासाठी कोणाचीही लाचारी स्विकारून चाटूगीरी करायला तयार होतात. म्हणून वामनदादा लिहतात.....

मला चिड येत नाही हाच माझा गुन्हा
दोष देऊ कुणा, सांगा दोष देऊ कुणा
आहे तेच माझे गाव आणि तेच गावकर
माझा भिम असताना कापायचे थरथर
गेला गेला भिमराणा, आला नेभळटपणा

भिम गेल्या पाठी भिमाने निर्माण केलेला दरारा, त्यांनी दिलेला स्वाभिमान येथून निघून गेला कारण लोकांनी इमान विकायला सुरुवात केली. प्रस्थापितांची गुलामी आणि लाचारी करून स्वतः चा सन्मान गमवणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळेच सामाजिक पतन होताना दिसत आहे. सामाजिक पतन होत असताना स्वार्थ व संधी साधु लोकांमुळे समाजाचे विभाजन होऊन तुकडे तुकडे झाले. चळवळ व सामाजिक आंदोलनाडे फारसे कोणाचे लक्ष नाही. म्हणून वामनदादा लिहतात..

म्हणवीती भीमाचे चेले जरी हे मेले
यांनीच भीमाचे तुकडे तुकडे केले
बांधला भीमाने संघटनेचा किल्ला
हे तिथेच करती रणगाड्यांनी हल्ला
कोसळला किल्ला आता कुणी हे बोले
म्हणवीती भीमाचे चेले तरी हे मेले

बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने अनेक संघटना पक्ष तयार करून तुकडे तुकडे करून ठेवले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा संदेशच विसरून गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकर गेल्यापाठी आपल्याला काहीच करायचे नव्हते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी करून ठेवलेले फक्त जतन करायचे होते पण धुर्त लोकांनी तेही केले नाही. शिक्षणासाठी पिपल्स एज्युकेशन सोसायटी, धम्माच्या प्रसार प्रसारासाठी भारतीय बौद्ध महासभा, संरक्षणासाठी समता सैनिक दल, राजकारणासाठी रिपब्लिकन पक्ष अस सर्व काही बाबासाहेब आंबेडकर यांनी करून ठेवले असताना त्यांचे व्यवस्थित संगोपन ही झाले असते तर आज वेगळाच रुबाब असता परंतू याचेही तुकडे तुकडे करून बाबासाहेब आंबेडकर यांची वाटणी करून घेतली. ज्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर चालुन राष्ट्रहीत जोपासायला पाहिजे होते तेच लोक लाचार झाल्याने सत्ता हाती असलेल्या लोकांनी देश विकुन टाकला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येकाला देशाचा मालक बनवला परंतु वास्तवात देशाची बरिच मोठी संपती उद्योगपती च्या घशात घातली. जनतेच्या रक्ताचे पाणी करून हा देश चालतो आणि याच लोकांना कष्टकरी लोकांना उपाशी रहावे लागते हि मोठी शोकांतिका आहे. म्हणून दादा लिहतात...

टाटा बिर्ला तरतील
बाकी सारेच उपाशी मरतील
सारे परदेशी येतील
ताबा धंद्याचा घेतील
तेच तिजोरी भरतील
बाकीचे सारे उपाशी मरतील

वरिल रचनेवरून वामनदादा यांचा दुरदृष्टीकोन दिसुन येतो. आज उद्योग धंदे व पैसा विशिष्ट लोकांच्या हाती गेला, सेझ च्या नावाखाली विदेशी कंपन्या देशात येत आहे. जनतेची निव्वळ लुट सुरू आहे. या यातून आर्थिक विषमता देशात परिपक्व केली जात आहे. धार्मिक द्वेष करून राजकीय झोळी भरण्यासाठी स्पर्धा लागलेली आहे. हिंदु मुसलमान वाद पेटवून माणसामध्ये वैर निर्माण करण्याचे काम आज राजकीय नेते महापुरुषांचे नाव घेऊन करत आहेत. म्हणून वामनदादा अशा लोकांना धडा शिकवण्यासाठी लिहतात...

शिवरायांच्या छायेखाली कधीच नव्हती वाण..!
आनंदाने नांदत होते हिंदू मुसलमान ..!!
काळ्यारात्री तळपत होतं जिच्या रूपाचं उन,
अशी देखणी होती एका मुस्लीमाची सून,
त्या तरूणीला आई म्हणाला राजा तो शीलवान,
आनंदाने नांदत होते हिंदु मुसलमान....!!

छत्रपती शिवाजी महाराज राजे होते. त्यांच्या वर कोणतेही बंधने नव्हते तरीही त्यांनी नैतिक संस्कार जपले. हिंदु मुसलमान वाद कधीच झाले नाही. एवढेच नाही तर राजेशाही असुनही त्यांनी महिलांना संरक्षण देण्याचे व सन्मान देण्याचे काम केले. आजची परिस्थिती बघितली तर सत्तेत असलेल्या आमदार खासदारांवर बलात्कार सारखे गंभीर गुन्हे दाखल असताना त्यांना सरकार कडून च पाठीशी घातले जाते एवढे नैतिक पतन आज आपल्याला झालेले दिसते. आणि हे सर्व फक्त जाती धर्माच्या नावावर केलेल्या निच राजकारणामुळे घडत आहे. जातीधर्माच्या नावाखाली बलात्काराच्या गंभीर गुन्हेगार गाराला सुद्धा येथे आश्रय देऊन निर्दोष ठरवले जाते. म्हणून जात पात मोडून फक्त माणसाला किंमत असायला पाहिजे म्हणून वामनदादा लिहतात....

धर्म इथे आहे तर जातपात आहे
जातपात आहे तर घातपात आहे
अशा घातपाताला नको आज थारा
जळु द्या हा धर्म येथेच साराच सारा

धर्मापेक्षा माणसाचे कर्म महत्त्वाचे आहेत आणि धर्माच्या नावावर जर घातपात होत असेल तर असा धर्म जाळणे गरजेचे आहे असे दादा म्हणतात. वामनदादा यांच्या प्रत्येक शब्दांत सत्य, समता व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव होतो. आंबेडकरवादी चळवळीतील एक सर्वात मोठे नाव लोकशाहीर वामनदादा कर्डक हे होय. अशा थोर व सच्चा अनुयायी यांचा आज स्मृतीदिन.. दादांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन...

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## मान्सूनपुर्व सर्व कामे संबधित..

करावी. पावसाळ्याच्या दिवसात संपर्क तुटणाऱ्या गावांना पुरेशा प्रमाणात औषधसाठा, धान्य पुरवठा करण्यासाठी नियोजन करावे. जिल्ह्यात संभाव्य पूरबाधित १०५ गावे असून, पूर परिस्थितीमध्ये काय करावे व काय करू नये या बाबतच्या उपाययोजनांची जाणीव करून देण्याकरिता पूरग्रस्त गावातील लोकप्रतिनिधी, सेवाभावी, सामाजिक संस्था यांनी नागरिकांना प्रशिक्षण द्यावे तसेच सर्व स्तरावर जनजागृती करावी. सर्व प्रकल्पाची तातडीची दुरुस्ती करून घ्यावी. बिनतारी यंत्रणा कार्यान्वित करावी. हवामान खात्याकडून इशारे प्राप्त होताच सर्वदूर माहिती जलद गतीने पोहोचवावी. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा अद्ययावत करण्यासाठी प्रत्येक विभागाने आपला आराखडा दि. २० मेपूर्वी सादर करावा. तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करावा. पावसाळ्यात जनावरांची रोगराई नियंत्रणात ठेवण्याबाबत पशूसंवर्धन विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. वीज कोठे पडणार आहे याची माहिती देणारे दामिनी प हवामान विभागाने तयार केले आहे. जिवितहानी टाळण्यासाठी दामिनी पचा वापर करावा अधिकाऱ्यांनी या बाबत दक्षता घेवून संबधित ठिकाणी आवश्यक माहिती द्यावी .आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने निर्माण करण्यात आलेली यंत्रणा व साधने सुस्थितीत असल्याबाबत खातरजमा करून तसे प्रमाणपत्र, अहवाल सादर करावा. वारंवार आपत्तीची घटना घडणा-या ठिकाणी सूचनाफलक लावावेत अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

शहरी भागामध्ये नाले, ड्रेनेज तुंबल्याने गटारांचे पाणी बोरवेल किंवा पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन मध्ये मिसळून साथीचे रोग निर्माण होणार नाही याची खबरदारी घ्यावी. पावसाळ्यात उत्पन्न होणाऱ्या साथीच्या रोगराईंना थांबविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात मुबलकपणे औषधीसाठा व इतर अनुषंगिक साहित्याची उपलब्धता ठेवावी. गावागावात बचाव पथके प्रशिक्षित करणे, होडी, यांत्रिकी बोटी, पोहणारे आदी साधनसामुग्रीची उपलब्धता तपासावी. पुरपरिस्थितीमध्ये नागरिकांना तात्पुरता निवारा, मुलभुत सोयी देण्यासाठी नगरपालिका व तहसिल विभागाने नियोजन करावे. नदीकाठावरील गावांत धोकादायक ठिकाणी (ब्लू लाईन, रेड लाईन) सीमांकन करावे, पाऊस वादळ प्रसंगी वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी महावितरणाने पूर्व नियोजन करुन जलद सेवा पुरवावी. जिल्ह्यातील सर्व प्रकल्पाचे स्ट्रक्चर सुस्थितीत असल्याची खात्री संबंधित विभागाने करावी.तसेच शहर आणि ग्रामीण भागात अनधिकृत होर्डिंगची तपासणी करून कारवाई करुन तात्काळ धोकादायक होर्डिंग काढण्यात यावेत असे निर्देशही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यावेळी दिले. यावेळी पूरस्थितीबाबत पूर्व सूचना व प्रसारण व्यवस्था, मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प संभाव्य पूरपरिस्थितीमध्ये बाधित होणाऱ्या गावे, पूर परिस्थितीत नदीवरील पाण्याखाली जाणारे जिल्ह्यातील सर्व पूल तसेच पाण्याचा विसर्ग याबाबत आढावा घेण्यात आला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वाराणसीतून

त्यांचं खातं असून या खात्यात केवळ ७,००० रुपये आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रतिज्ञापत्रात गेल्या पाच वर्षांमधील प्राप्तीकर परतावा विवरण उपलब्ध आहे. त्यानुसार त्यांनी २०१८-१९ मध्ये त्यांची संपत्ती ११,१४,२३० रुपये दाखवली होती. तर २०१९ मध्ये त्यांच्याकडे १७,२०,७६० रुपये, २०२०-२१ मध्ये त्यांच्याकडे १७,०७,९३० रुपये, २०२१-२२ मध्ये १५,४१,८७० रुपये, तर २०२२-२३ मध्ये त्यांच्याकडे २३,५६,०८० रुपये इतकी संपत्ती दाखवण्यात आली आहे.नरेंद्र मोदी हे वाराणसीमधून तिसऱ्यांदा लोकसभेची निवडणूक लढवत आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यांनी गंगा पूजन करत वाराणसीशी असलेल्या गेल्या १० वर्षांच्या ऋणानुबंधांना उजाळा दिला. यावेळी ते म्हणाले, गंगा मातेने मला दत्तक घेतलं आहे. काशीबाबतचे ऋणानुबंद सांगताना मोदी भावूक झाले होते. यावेळी मोदी म्हणाले, लोकांचं माझ्यावरील प्रेम पाहून माझ्या जबाबदाऱ्या दिवसेंदिवस आणखी वाढत असल्याची मला जाणीव होते.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे, बाबा विश्र्वनाथांच्या नगरीतील देवासमान जनतेला माझं वंदन आणि नमस्कार! आजच्या रोड शोमध्ये मला तुमच्याकडून मिळालेला स्नेह आणि तुमचे आशीर्वाद माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. तुमचं प्रेम पाहून मी भारावून गेलो आहे. त्याचबरोबर मी काहीसा भावूकही झालो आहे. तुमच्या सर्वांच्या प्रेमाच्या सावलीत मागील १० वर्षे कशी गेली ते कळलंच नाही. गंगा मातेनं मला बोलावलं होतं. गंगा मातेनं मला दत्तक घेतलं आहे.

## धीरज वाधवान यांना..

न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली. याप्रकरणी सीबीआयने २०२२ मध्येच त्यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. महत्त्वाचे म्हणजे येस बँक घोटाळ्याप्रकरणी त्यांना यापूर्वीही अटक करण्यात आली होती. मात्र, सध्या ते जामीनावर बाहेर होते. सीबीआयने २०२२ मध्ये एकूण १७ बँकांची ३४ हजार कोटी रुपयांनी फसवणूक केल्याच्या आरोपाखाली त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यांनी २०१० ते २०१८ दरम्यान डीएचएफएलला ४२ हजार ७८१ कोटी रुपयांच्या कर्ज सुविधा दिल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. कपिल वाधवान आणि धीरज वाधवान यांनी मिळून हेराफेरी केली आणि मे २०१९ पासून कर्जाचं पेमेंट डिफॉल्ट करून ३४ हजार ६१५ कोटी रुपयांची फसवणूक केली, असं सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रात सांगण्यात आले होते.

## नरेंद्र मोदी तुम्ही कितीवेळा..

सुविधा पंतप्रधानांच्या घ्यायच्या आणि प्रधानसेवक असल्याचं ढोंग आणायचं, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला.

माझ्यावर (उद्धव ठाकरे) आणि शरद पवार यांच्यावर तुम्ही टीका करता. काय म्हणातात तर मला (उद्धव ठाकरे) माझ्या मुलाला (आदित्य ठाकरे) मुख्यमंत्री करायचं आहे आणि शरद पवार यांना सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्री करायचं आहे. ठीक आहे, आम्ही आमच्या मुलांसाठी करतो आहोत. पण तुम्ही स्वत: नवरदेव बनून बोहल्यावर किती वेळा उभा राहणार आहात. एकदा झालं, दोनदा झालं. तुमची हौस भागत नाही. मी पुन्हा येईल, पुन्हा येईल, आता बस्स झालं घरी जा, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर केली.

आता त्यांचे नेते म्हणत आहेत की, ट्रीपल इंजिन, ट्रीपल इंजिन. त्यांना अजून किती इंजिन लागतात काय माहीत नाही. ते फक्त डब्बे जोडत आहेत, पण इंजिन पुढे सरकतच नाही. गेल्या १० वर्षात ते फक्त थापाच टाकत आहेत. वाफाचं इंजिन होतं, तसं यांचं फक्त थापांचं इंजिन आहे. मात्र, आता तुम्ही कितीही डब्बे लावले तरी जनतेने ठरवलेलं आहे, देशातलं मुख्य इंजिनच बदलून टाकायचं. तुम्ही जी बुलेट ट्रेन आणत आहात, त्यापेक्षा जास्त स्पीडने तुमचं इंजिन गुजरातला पाठवणार आहोत, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी पालघरच्या सभेत बोलताना मोदींवर केला.

## मतदार यादीत नाव वगळलेल्यांना

अनेकांनी केले व जिल्हा प्रशासनाकडे काही तक्रारी देखील प्राप्त झाल्या.

आता ती नावे नेमकी मतदार यादीतून वगळलीच कशी, जिवंत असतानाही मतदार यादीत मयत म्हणून नोंद लागली कशी, या बाबींची चौकशी होणार आहे. तरीपण, यादीतून वगळलेल्या मतदारांना पुन्हा यादीत येण्यासाठी फॉर्म सहा भरावाच लागणार आहे.ज्यांचे नाव मतदार यादीतून वगळले गेले आहे किंवा जिवंत असूनही मयत नोंदविण्यात आले आहे, त्यांनी स्वत:चे आधारकार्ड किंवा जन्माचा एक पुरावा आणि रहिवासी पुरावा (वीजबिल किंवा इतर) वोटर हेल्पलाइन या संकेतस्थळावर अपलोड करावा. त्यानंतर सात दिवसांत संबंधित मतदाराचे नाव नव्याने समाविष्ट होते. पण, ही सुविधा ४ जूननंतर (लोकसभा निवडणुकीचा निकाल लागून आचारसंहिता संपल्यावर) सुरु होणार आहे.

गणेश निऱ्हाळी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, सोलापूर बोलताना म्हणाले की मतदार यादीतून नावे वगळण्यात आल्याच्या तक्रारींची पडताळणी केली जाणार आहे. पण, मतदार यादीतून नाव वगळलेल्या मतदारांना आचारसंहिता संपल्यानंतर 'वोटर हेल्पलाइन' या संकेतस्थळावर जावून फॉर्म नं. सहा भरून पुन्हा यादीत नाव समाविष्ट करता येणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सिन्नुर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती निमित्त भव्यदिव्य मिरवणूक संपन्न

**दुधनी/प्रतिनिधी :**

अक्कलकोट तालुकातील सिन्नुर येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३३ व्या जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. प्रारंभी तथागत गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रतिमापुजन मान्यवराचा हस्ते करुन सामुहीक बुध्द वंदना घेण्यात आले.उपास्थित प्रमुख मान्यवरांचा सत्कार जयभिम तरुण मंडळचा पदाधिकारीच्या हस्ते करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणुन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)चे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ दोडमनी, पत्रकार निंगप्पा निंबाळ,तंटामक्त अध्यक्ष सिध्दाराम जेवर्गी, पोलिस पाटिल राजासाहब पठान, सरपंच कल्पना सोनकांबळे, माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य लिंगराज हौदे, माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य जगदीश उजनी, ग्रामपंचायत सदस्य चन्नाया स्वामी, ग्रामपंचायत सदस्य शिराज पठान, ग्रामपंचायत लिपिक शिवपूत्र जेवर्गी, टिपु सुलतान ग्रुपचे अध्यक्ष करिम हिप्पारगी, वेदमुर्ती सोमाय्या स्वामी, डॉक्टर.अमोगी आळगी, शिवानंद हडपद इत्यादी मान्यवार उपास्थित होते.

यावेळी बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी म्हणाले की, सिन्नुर गावातील नागरीक हा सुजाण असुन महापुरुषांच्या जयंती असो,निवडणूक असो किंवा कुठल्याही जाती धर्माचे कार्यक्रम असो सर्वांनी जात पात न पाहता एकत्र येऊन कार्यक्रम यशस्वी करता,सहभाग घेता.ही सिन्नूर गावची संस्कार जपत आली आहे.इतर गावातील कार्यकर्त्यांनीया गावचे आदर्श घ्यावे असे प्रतिपादन श्री सैदप्पा झळकी यांनी याप्रसंगी व्यक्त केले

पत्रकार निंगप्पा निंबाळ बोलतांना असे म्हणालेत की तुम्ही एकादिवसात



जयंतीचा नियोजन करून असे भव्यदिव्य कार्यक्रम घेता आहे हे सगळे शक्य झालेत.तुमचा मंडाळात असलेली एकतामुळे.निस्वार्थ कार्यामुळे.पण एक खंत आहे की इते शिक्षणाची कमतरता आहे.अत्ता पर्यंत समाजातील कोणी व्यक्ती सरकारी नोकरदार झालेला नाही.ही खंत व्यक्त केले.त्याकडे सर्वानी प्रयत्न करावे असे प्रतिपादन निंगप्पा निंबाळ यांनी या प्रसंगी व्यक्त केले

तंटामुक्त अध्यक्ष सिध्दाराम जेवर्गी असे म्हणालेत की डॉं.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाला पवित्र असे भारतीय संविधान दिले.त्या संविधानावर संपूर्ण देश चालतो.त्यानुसारच न्याय निवाडा होतात असे म्हणाले.माजी सरपंच लिंगराज हौदे, पोलिस पाटिल राजासाहब पठाण, शिराज पठाण, शिवपुत्र जेवर्गी इत्यादी मान्यवरानी यावेळी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रमुख उपास्तिथी म्हणुन गावातील मुस्लिम संघटना, लिंगायत संघटना,धनगर संघटना, वडार संघटना,बजंत्री संघटना, उजनी समाज संघटना व गावातील सर्व समाजाचे मंडळाचे कार्यकर्ते पदाधिकारी व ग्रामपंचायत सदस्य,ग्रामपंचायत क्रमचारी, सोसायटी सदस्य, गावातील आजी माजी सदस्य व गावातील सर्व समाजाचे नेतेगण उपास्थित होते. जयभिम तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.जयकुमार सोनकांबळे यांनी कार्याक्रमाचे प्रास्ताविक व आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत कांबळे, अप्पू सोनकांबळे, भिमराव सोनकांबळे,सुलतान सोनकांबळे,पुटू भगळे, धर्मण्णा मांग,सिध्दाराम सोनकांबळे,संगप्पा कांबळे,राम कांबळे,आकाश कांबळे,धर्मा सोनकांबळे,हुचप्पा कांबळे,सुरेश सोनकांबळे, शिवानंद सोनकांबळे,राजू सोनकांबळे,कैलाश सोनकांबळे,लक्ष्मीपुत्र कांबळे,रूतिकेश सोनकांबळे,राकेश कांबळे,शाणप्पा सोनकांबळे,विजय कांबळे,सतिस कांबळे,बाबू कांबळे,दिपक कांबळे,खाजपा सोनकांबळे, रवि कांबळे,दिपाक कांबळे,सुनिल सोनकांबळे,प्रशांत सोनकांबळे,राहुल सोनकांबळे,हणमंत सोनकांबळे,बसप्पा सोनकांबळे, बाळप्पा कांबळे,कलप्पा कांबळे,कंटेप्पा कांबळे,शिवप्पा सोनकांबळे,दत्ता कांबळे,अरुण कांबळे,नागेश सोनकांबळे,शाणप्पा सोनकांबळे, यांचासह जयभिम तरुण मंडळाचे कार्यकर्तेनी परिश्रम घेतले.गावचे ग्रामदैवत श्री.संगमेश्र्वर महाराज जत्रा महोत्सव निमित्त गावकारी परगावी घेलेले जत्रास आलेला होता.डिजेचा तालावर भिम गीताचा आवाजाने आणि फटाकेचा आताषभाजीने जयभिमचा घोषणाने मिरवणूकीचा परिसर निळामय झाला होता.जयभिम तरूण मंडळाचा वतीने जेवनाची व्यवस्था केला होता.सर्वानी जेवणाची आणि नाचण्याची मनसोक्त आनंद लुटला.

# अचलेर शिवबसव संस्थान मठात पुराण प्रारंभ

## मठ संस्कार देणारे केंद्रे : नंदगवाचे राजशेखर महस्वामिजी

**अक्कलकोट /लोहारा (विशेष प्रतिनीधी )**

घरात आईने मुलांना संस्कार दिले तर मठातील गुरू समाजाला संस्कार देत असतात. असे नंदगाव विरक्त मठाचे राजशेखर महास्वामीजी यांनी मत मांडले की त्यामुळेच मठ हे संस्कार केंद्र म्हणून लोकप्रिय आहेत.




**बसव जयंतीनिमित्त सुरू झालेला पुराण कार्यक्रम मंगळवार २४ मे रोजी समाप्त होणार आहे. २४ मे रोजी सकाळी पडसावळी-डोणागाव मठाचे डॉ.शंभूलिंग महसवामिजी, राजेश्र्वरचे श्री घनलिंगरुद्रमुनी स्वामीजी, जेवळी येथील गंगाधरा स्वामीजी, बसवेश्र्वर मंदिराचे दत्त महाराज यांच्या उपस्थितीत श्री अभिनव सुत्रेश्र्वर महस्वामिजिंच्या अध्यक्षतेखाली गद्धागिस. महारुद्राभिषेक, पंचाचार्य ध्वजारोहण, अय्यचार, लिंगदीक्षा पुराण सोहळ्याच्या समाप्ती होणारं आहे. नंतर आलेल्या भाविकांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम. या सर्व कार्यक्रमांचा लाभ सर्व भक्तांनी घ्यावा, अशी विनंती स्वामीजीनी केली आहे.**

शनिवारी रात्री उस्मानाबाद जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील आचलेर येथील शिवबसव हिरेमठ येथे बसव जयंती व ज्येष्ठ महास्वामीजींच्या पुण्य स्मरणार्थ आयोजित पुराण कार्यक्रमात नंदगवा विरक्त मठाचे राजशेखर महास्वामीजी आपले विचार व्यक्त करतान पुढे म्हणाले की , मातांनी आपल्या मुलांना मठात आणून त्यांना योग्य मार्ग दाखवण्यासाठी गुरूकडून लिंगदीक्षा द्यावी. चांगला समाज घडवण्याची जबाबदारी घरातील आई व मठातील गुरू या दोघांवर मोठी जबाबदारी आहे . इतके मठ आणि मठाधिपती असतानाही लिंगायत समाज भरकटत चालेला असल्याची चिंता महस्वामिजिनी व्यक्त केली.उपस्थित अचलेर विरक्तमठचे श्री.बसवराजेंद्र महस्वमिजी म्हणाले की, अचलेर गाव जरी मराठवाड्यात असले तरी उत्तम लिंगायत संस्कृती असलेले गाव आहे. येथे दोन मठ असून मी आणि श्री.अभिनव सुत्रेश्र्वर महासवामिजी समाजाच्या विकासासाठी जोड बैला सारखे एकत्र काम करत असल्याचे सांगितले. बाळेहोन्नूर शाखा मठाचे शिवबसव हिरेमाठा चे मठाधिपती अभिनव सुत्रेश्र्वर स्वामीजी, शिवबसव मठ हा प्राचीन मठ आहे . गेल्या तीन वर्षांपासून मठात चांगले सार्वजनिक कार्यक्रम राबविले जात असून, मठातील भक्तांनी प्रतिसाद देण्याची गरज असल्याचे सांगितले. डसावळीच्या मल्लय्या शास्त्री यांनी कलबुर्गीच्या महादासोही शरणबावेश्र्वराचा पुराण प्रवचन केलें. आणि विजयकुमार आळंद यांनी तबल्याची साथ दिली. लिंगायत समाजाच्या उत्थानासाठी चांगले कार्य करणारे वागदरी चे पत्रकार शिवानंद गोगाव, घालय्या स्वामी, शांतेश्र्वर कोटे, अप्पू करजगी यांचा गौरव करण्यात आला.

विकास स्वामी, मल्लय्य शिवशरण स्वामी, मल्लीनाथ अष्टगे, शिवराजा स्वामी, सुत्रेश्र्वर स्वामी, अमृतप्पा पटणे, प्रवीणा स्वामी यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. शेखर स्वामी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर मल्लय्या स्वामी यांनी आभार मानले.

# स्वेरीमध्ये 'परदेशातील शिक्षणाच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन सत्र संपन्न




**पंढरपूर/प्रतिनिधीः**

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी चर्चा सत्राचे आयोजन केले होते. 'परदेशातील पदव्युत्तर शिक्षणाच्या संधी' या विषयावर आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजिलेल्या दोन दिवशीय कार्यशाळेत दादर-मुंबई येथील 'ई-प्लॅनेट इंटरनॅशनल' या कंपनीचे ऑस्ट्रेलिया स्थित असलेले कंपनीचे संचालक सदानंद मोरे हे बहुमोल मार्गदर्शन करत होते.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे दोन दिवसीय चर्चासत्र पार पडले. प्रारंभी दीपप्रज्वलनानंतर प्रास्तविकात ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे अधिष्ठाता प्रा.ए.ए. मोटे यांनी हे दोन दिवशीय चर्चासत्र आयोजित करण्यामागील हेतू स्पष्ट केला. 'अभियांत्रिकी व फार्मसी मधून पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी हे परदेशातील पदव्युत्तर शिक्षणासाठी उपलब्ध असणाऱ्या संधी शोधत असतात. ऑस्ट्रेलिया, युनायटेड स्टेट्स, कॅनडा, न्यूझीलंड, इंग्लंड अशा विविध देशांमध्ये अशा संधी मिळविण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. ई-प्लेंनेट इंटरनॅशनलच्या माध्यमातून अनेक प्रवेश परीक्षा व प्रक्रिया, विजा, परदेशातील शिष्यवृत्ती, राहण्याची सुविधा या संदर्भात विशेष मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेताना असणारे नियम व मार्गदर्शक तत्वे यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. परदेशात भारतीय विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या शैक्षणिक व व्यावसायिक संधीबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. पुढे विद्यार्थ्यांनी परदेशातील शिक्षणाबाबत विचारलेल्या विविध प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या विशेष प्रयत्नातून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कंपनीचे अधिकारी संगीता ढसाळ, रुपा कनोजिया, स्वप्नील ढसाळ, तन्मय सरकार, स्वेरीचे संशोधन अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने व इतर प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

# पस्तीस वर्षानंतर स्नेहमेळाव्यात रमले दहावीचे विद्यार्थी

## जि.प.प्रशाला नंदगांव येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात



**वागदरी/एस.के.गायकवाड**

जि. प. प्रशाला नंदगांव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथील १९८८-८९ मधील इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे माजी शिक्षक व निवृत्त विस्ताराधिकारी श्री. बाबूराव पडसलगे होते. यावेळी माजी शिक्षक श्री. प्रभाकर उपासे, श्री. गुरुनाथ मुळे, श्री. अशोक धुमाळ, श्री. रामचंद्र बुरगुटे, श्री. शिवाजी वऱ्हाडे, माजी सरपंच श्री. सिद्धेश्र्वर कोरे, शालेय समिती अध्यक्ष श्री. सागर पाटील आदी उपस्थित होते.प्रशालेचे माजी विद्यार्थी डॉ. सतीश कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत सांगितले की, जि. प. प्रशाला नंदगांव या शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच आज अनेक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपला नावलौकिक प्रस्थापित केला आहे.पस्तीस वर्षांनी भेटलेल्या या सर्व माजी विद्यार्थ्यांना एकमेकांना भेटून खूप आंनद झाला. यावेळी अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात शाळेतील आठवणी सांगितल्या. हा माजी विद्यार्थी संघ केवळ या स्नेहमेळाव्यापुरता मर्यादित न राहता, भविष्यात आपल्या समस्या सोडवण्यासाठी एकमेकांना सहकार्य करावे अशी भावना व्यक्त केली.

तर माजी शिक्षकांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आजच्या या स्नेहमेळाव्यामुळे आमच्या भूतकाळातील सुखद आठवणींना उजाळा मिळाला आहे. आमचे विद्यार्थी मोठे होताना आम्हाला खूप आनंद होतोय अशी भावना त्यांनी व्यक्त केली.या स्नेहमेळाव्यासाठी मुंबई, पुणे, सोलापूर आदी शहरातून जवळपास पन्नास माजी विद्यार्थी आणि विद्यार्थीनी उपस्थित होते. सर्व माजी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना स्नेहमेळाव्याचे स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.


यावेळी माजी विद्यार्थीनींना शाळेतील आठवणी सांगिताना गहिवरून आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सतीश कुलकर्णी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी कल्याणी कोरे, नजीर शेख, विलास जेवळे, सूर्यकांत शरणार्थी, श्रीशैल कट्टे, चंद्रकांत बशेट्टी राजकुमार पाटील आदींनी परिश्रम घेतले.स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# विठ्ठलराव शिंदे कारखान्यामार्फत ऊस तोडणी मजूरांना ३४ टक्के वाढीचा फरक एकरक्कमी अदा

**माढा/प्रतिनिधीः**

साखर संघ स्तरावर झालेल्या ऊस तोडणी व बैलगाडीने वहातूकीचे सुधारीत सामंजस्य करारानुसार ऊस तोडणी मजूरांना तोडणी दरामध्ये ३४ टक्के वाढ करणेस मंजूरी दिलेनुसार विठ्ठलराव शिंदे कारखान्याने ऊस तोडणी मजूरांना ऊस गाळप हंगाम २०२३-२४ पासून तोडणी दर वाढ लागू करून फरकाची एकूण ३६ कोटी ४ लाख रक्कम बँकेत जमा करणेत आली असल्याची माहीती संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांनी दिली.



अधिक माहीती देताना आ.शिंदे म्हणाले की, हंगाम २०२०-२१ ते २०२२-२३ या तीन गाळप हंगामाकरीता अस्तित्वात असलेला ऊस तोडणी व वाहतूक करणा-या शेतमजूरांच्या मजूरीच्या दराकरीता असलेला करार संपल्यामुळे सन २०२३-२४ पासून शेतमजूरांच्या दरामध्ये वाढ करून नवीन करार करण्यासंबंधी ऊस तोडणी/शेत मजूरांच्या संघटनांनी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि.मुंबई यांचे स्तरावर प्रस्ताव सादर केले होते. त्यानुसार साखरसंघ स्तरावर दि.४ जानेवारी, २०२४ रोजी संघटना प्रतिनिधी व कारखाना प्रतिनिधी यांचेमध्ये बैठक होवून हंगाम २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन हंगामाकरीता डोकी सेंटर, गाडी सेंटर व टायरगाडीचे ऊस तोडणी दरामध्ये ३४ टक्के वाढ व मुकादम कमिशनमध्ये १ टक्का वाढ करून २० टक्के करणेस मंजूरी देण्यात आली आहे. हा वाढीचा करार हंगाम २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन हंगामाकरीता लागू असणार आहे. तोडणी दराचे ३४ टक्के वाढीमुळे बैलगाडी/ युवराज साठी सुधारीत दर रू.३८१.८४, डोकीसेंटर,ट्रक,ट्रॅक्टर रू.४३९.२१ व गाडी सेंटर रू.४९०.०९ असा सुधारीत दर होत आहे. या वाढीमुळे अंदाजे ३६ कोटी रूपयांचा अतिरिक्त बोजा कारखान्यावर पडला आहे.सन २०२३-२४ मध्ये युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब साठी तोड वाहतूक केलेल्या ऊस तोडणी मजूरांना ही दरवाढ लागू करून त्यानुसार तोडणी वाहतूक बिले तयार करण्यात आली आहेत. या वाढीव दरानुसार तोडणी वाहतूक बिले तयार करून वाढीच्या फरकाची एकूण ३६ कोटी ४ लाख रक्कम बँकेत जमा करणेत आली आहे. ३४ टक्केवाढीचा फरक देणारा विठ्ठलराव शिंदे राज्यातील एकमेव कारखाना ठरला आहे. कारखान्याचा गाळप हंगाम यशस्वीरित्या पार पडणेसाठी ऊस तोडणी मजूर,मुकादम,वाहनमालक यांचा सहभाग मोठा आहे. पुढील सन २०२४-२५ गाळप हंगामामध्ये दोन्ही युनिटकडे गाळपक्षतमेनुसार ऊस पुरवठा होणेसाठी ऊस तोडणी वाहतूकीचे करार सुरू करण्यात आले असून त्यांना कारखाना धोरणानुसार डव्हान्स वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# पशुपालकांनी जनावरांचा एअर टॅगिंग करून भारतीय पशुधन प्रणालीवर नोंद करा : सहाय्यक आयुक्त

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्व पशुपालकांनी जनावरांचा एअर टॅगिंग करून आणि त्याचे भारतीय पशुधन प्रणालीवर नोंद बंधनकारक करण्यात आली आहे त्यामुळे तालुक्यातील पशुपालकांनी जनावरांची नोंद भारत पशुधन प्रणालीवर करून घ्यावे असे आव्हान सहाय्यक आयुक्त तालुका लघु सर्व रोग चिकित्सालय अक्कलकोट यांनी आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे.महाराष्ट्र राज्याचा अक्कलकोट तालुक्यातील कृषी पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाने याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे.

त्यानुसार भारत पशुधन प्रणालीवर पशुपालकांची सर्व माहिती जनावरांचे वय लिंग जात मिल्किंग स्टेट्स मोबाईल नंबर आधार नंबर आधी माहिती अध्यावत करण्याकामी सर्व पशुपालकांनी आपल्या जनावरांना इयर टॅगिंग करणे बंधनकारक आहे.

एक जून २०२४ पासून अद्यावत इयर टॅग आणि भारत पशुधन प्रणालीवर नोंदी शिवाय जनावरांची खरेदी विक्री करता येणार नाही तसेच पशुवैद्यकीय सेवा केंद्र आणि राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणार नाही अशी स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचबरोबर विजेचा धक्का वन्य पशूचा हल्ल्यामुळे मृत्यू मुखी पडलेल्या पशुधनास नुकसान भरपाईची रक्कम देण्यात येणार नाही राज्यांतर्गत जनावरांची वाहतूक आणि मालकी हस्तांतरण होणार नाही म्हणून भारत पशुधन प्रणालीवर जनावरांची नोंद करणे बंधनकारक आहे. म्हणून तालुक्यातील सर्व पशुपालकांनी आपल्या जनावरांना नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून इयर टॅगिंग करून घ्यावे आणि त्याचा अचूक नोंदी भारत पशुधन प्रणालीवर तात्काळ नोंद करून घ्यावेत असे आवाहन आयोजित पत्रकार परिषदेत सहाय्यक आयुक्त तालुका लघु सर्व रोग चिकित्सालय अक्कलकोट यांनी केला आहे.




सध्या मान्सून पूर्व लसीकरण करण्या कामी पशुवैद्यकीय अधिकारी कर्मचारी तालुक्यातील सर्व गावांना भेटी देऊन गाय वर्ग, म्हैस वर्ग,शेळी,मेंढी,यामध्ये घटसर्फ लंपी चर्मरोग अंतरविषार रोगांचे लसीकरण करण्याचे काम चालू असून तालुक्यातील सर्व पशुपालकांनी आपल्या कडील जनावरांची अद्यावत माहिती भारत पशुधन प्रणालीवर माहिती भरून जनावरांना इयर टॅग करून घ्यावे किंवा नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधून करून घ्यावे.

**– डॉ.प्रकाश ढगे सहाय्यक आयुक्त**
**तालुका लघु पशुचिकित्सालय अक्कलकोट**

■ ४० वर्षांनी मिळाला आठवणींना उजाळा ■

# तब्बल ४० वर्षांनी भेटले शाळेतील विद्यार्थी,विद्यार्थिनी, एकत्र येऊन स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात साजरा




**पत्रकार नामदेव निर्मळे**

दत्तवाड तालुका शिरोळ अक्काताई नेजे हायस्कुल येथे १९८३/८४ या वर्षातील दहावी विद्यार्थी, विद्यार्थिनी तब्बल ४० वर्षांनी एकत्र येऊन स्नेह मेळावा संपन्न केला. नोकरी, उद्योग, संसार, हे सारे बाजूला ठेवून सर्वजण मेळाव्यामध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. वयाचे भान न ठेवता सर्वांनी धमाल केली.

एकूण ८६ विद्यार्थी, विद्यार्थिनी एकत्र शाळेमध्ये शिकत होते. पूर्वी रस्त्यात गुडघ्या एवढे खड्डे, खड्ड्यात पावसाचे पाणी, ऊन,वारा याला ना जुमानता पायी अनवाणी चालत जाऊन अशा कठीण परिस्थितीत त्यांनी आपली शाळा पूर्ण केली.सर्वांनी एकत्र आल्यावर त्यांच्या आनंदाला पारा राहिलेला नव्हता. आनंदाचे अश्रू काही विद्यार्थ्यांच्या डोळ्यातून येत होते.पूर्वीचे दिवस त्यांना पुन्हा जागृत केले.

गावातून फेरी काढण्यात आली. या कार्यक्रमला शिक्षक श्री जाधव, कदम, सुरवशी, जुगळे, सिदनाळे, पंडित ठोमके, ए. बी. पाटील या गुरुजीचां सत्कार करण्यात आला शाळेमधील अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनी आज चांगल्या पदावर काम करत आहेत. याचा मला असा सार्थ अभिमान आहे.असे विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या तोंडी होते. या कार्यक्रमाच्या शेवटी सैराट गाण्यावरती सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी आपले वय विसरून मनसोक्त डान्स केला. या कार्यक्रम चे नियोजन संजय माने, संजय तावदारे, राम कलगी, सुरेश तिप्पानावर, सुलोचना किलकर यांनी केले.

# तीर्थक्षेत्र विकासाचे पर्व मंडळाकडून सुरु : संजयकाका पाटील



**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली तीर्थक्षेत्र विकासाचे पर्व मंडळाकडून सुरु असल्याचे मनोगत सांगलीचे खासदार संजयकाका पाटील यांनी व्यक्त केले. ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. न्यासाचे एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, मल्लिनाथ कोगणुरे, शिवकुमार स्वामी, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# सहकार शिरोमणी कारखान्यामध्ये ऊस तोडणी वाहतूक करार प्रारंभ

**पंढरपूर/प्रतिनिधी**

भाळवणी दिनांक १४/५/२०२४ चंद्रभागा नगर सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या येत्या गणित हंगाम सन २०२४ २५ साठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने ऊस तोडणी वाहतुकीचे करार करण्याचा शुभारंभ कारखान्याचे चेअरमन माननीय श्री कल्याणराव वसंतराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे व्हाईट चेअरमन महा श्री भारत सोपान कोळेकर व तोडणे वाहतूक समिती चेअरमन म्हणून व स्वर्गीय वसंत दादा प्रतिनिधी पूजन करून करण्यात आले यावेळी ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार धनाजी कवडे शंकर बागल अर्जुन बागल सुरेश बागल संग्राम कवळे यांच्या ऊस तोडणी वाहतुकीचे प्राथनिधिक करार करण्यात आले गणित हंगाम २०२४ पंचवीस करिता सहकार शिरोमणी साखर कारखान्याकडे सुमारे ११००० एकर नोंद झाली असून शेती विभागाचे मार्फत उसाच्या नोंदी घेण्याचे काम चालू आहे त्यामुळे कारखान्याकडे झालेल्या उसाच्या नोंदी या पुढे उष्णतेचा यांचा विचार करून सुमारे चार लाख पंचवीस हजार मीटर गणिताचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे दैनंदिन सरासरी ३५०० मीटर उसाची गणित होण्याच्या दृष्टीने २०७५ ट्रक व ट्रॅक्टर ३०० बैलगाड्या १०० बजेट ट्रॅक्टर गाडी व तीन ऊस तोडणी मशीनचे करार करून ऊस तोडणी यंत्रणा सद्य ठेवण्यात येणार आहे असल्याचे व्हाईट चेअरमन भारत कोळेकर यांनी सांगितले गळीत हंगाम २०२४ मध्ये बिसलेरी प्रकल्प सहा वीज निर्मिती प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालवण्यात येणार असून मशिनरी देखील दुरुस्तीची कामे निळी धुळीत पूर्ण करण्यात येणार असल्याची सांगून कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊस तोडणी वाहतूकदारांनी कारखान्याची शेती विभागाची संपर्क साधून येत्या गणित हंगामासाठी आपले करार करावे असे आव्हान ही श्री कोळेकर यांनी केली. याप्रसंगी कारखान्याची संचालक परमेश्र्वर लामकानी सहकार्यकारी संचालक पोपटराव मोरे शेती अधिकारी प्रतापराव थोरात सर्व ग्री ऊस उत्पादक वाहतूक उपस्थित होते



# पंढरपुरात अखंड शिंपी समाज परिवाराचा गेट टु गेदर कार्यक्रम संपन्न

**पंढरपूर/प्रतिनिधी:**

अखंड शिंपी परिवारच्यावतीने सनई–चौघडा अर्थात गेट टु गेदर कार्यक्रम रविवार दि. १२ रोजी येथील संत मीराबाई मठ येथे उत्साहात संपन्न झाला. परिवाराचे प्रमुख ज्ञानेश्वर वडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. प्रमुख उपस्थिती म्हणून संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. एकनाथ नामदास महाराज होते. यावेळी नाशिक महानगर नामदेव शिंपी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष अतुल मानकर, नामदेव महिला परिषद महाराष्ट्रच्या उपाध्यक्षा व नामदेव महिला कार्यकारिणी सांगलीच्या अध्यक्षा स्वातीताई पिसे, नामदेव महिला परिषदच्या खजिनदार आणि नाशिक महानगर नामदेव सांस्कृतिक महामंडळच्या महिला उपाध्यक्षा अर्चना मानकर, बाळासाहेब आंबेकर सातारा, सुचिता महाडिक कोल्हापूर, महाराष्ट्र महिला विकास मंच, (पश्चिम महाराष्ट्र) सांगलीच्या मीनल कुडाळकर, तसेच अखंड शिंपी परिवारचे आधारस्तंभ नारायण धोंगडे, गायत्री गवांदे आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्व मानवांच्या हस्ते विठ्ठल–रुक्मिणी व संत नामदेव महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. सर्व मान्यवरांना विठ्ठलाची मूर्ती भेट देऊन येथोचित सत्कार करण्यात आला. त्यांनी कार्यक्रमाला भरभरून शुभेच्छा दिल्या.



प्रमुख पाहुणे ह.भ.प. एकनाथ महाराज नामदास म्हणाले, आजच्या धावपळीच्या काळात मुला–मुलींचे विवाह जमविणे ही बाब अवघड होत आहे. यासाठी अशाप्रकारचे मेळावे घेणे गरजेचे आहे. या माध्यमातून वधु–वरांच्या पालकांच्या गाठीभेटी होऊन विवाह जमविणे सोपे होत असल्याचे ते म्हणाले. मीनल कुडाळकर म्हणाल्या महाराष्ट्र महिला विकास मंचच्या माध्यमातून महिलांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. महिलांनी फक्त चुल व मुल यापुरते मर्यादित न राहता सामाजिक कार्यात अग्रेसर होणे गरजेचे आहे. यासाठी त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन व मदत करण्यासाठी आपण स्वतः प्रयत्नशील असल्याचे सांगितले.सदर कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे या कार्यक्रमात ज्या व्यक्तींनी समाजासाठी विशेष योगदान दिले त्यांना जीवन गौरव पुरस्कार, ज्या महिलांनी प्रेरणादायी कार्य करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे अशा रणरागिनींना स्वयंसिध्दा पुरस्कार देवून गौरविण्यात आले. सदर मेळाव्यात इच्छुक वधु–वरांनी उत्स्फुर्तपणे आपली नावनोंदणी केली.

शिरोमणी फाउंडेशनच्या म्हणजेच सनई चौघडा गेट–टुगेदर कार्यक्रमाच्या सर्व सदस्यांचा व्यासपीठावरील मान्यवरांनी पुरस्कार देऊन सन्मान केला. गायत्री लचके, नाशिक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. अतिशय सुंदर अशा आनंदमय वातावरणात ज्ञानेश्वर वडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष अजय निकते, कायदेशीर सल्लागार ॲड. विनायक उंडाळे, शिवकुमार भावलेकर यांनी परिश्र घेतले.

## पुरातन मंदिर संवर्धनाची कामे निकृष्ट दर्जाची!

# लखुबाई मंदिराच्या कामात मुरुमाऐवजी मातीचा वापर !! गणेश अंकुशराव

**पंढरपुर/प्रतिनिधी**

सध्या पंढरपुरातील श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरासह परिवार देवतांच्या मंदिरांचे पुरातन मंदिर संवर्धनांतर्गत कामे चालु आहेत; परंतु सदर कामे ही कांही ठिकाणी निकृष्ट दर्जाची होत असल्याचा आरोप पंढरपुरातील महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी केला असुन आज स्वत: गणेश अंकुशराव हे प्रशासकीय अधिकारी व आपल्या कार्यकर्त्यांसह येथील लखुबाई मंदिराचे काम सुरु असताना त्याठिकाणी गेले व येथे काम करताना मुरुमाऐवजी मातीचा वापर होत असल्याचे अधिकार्यांना दाखवून दिले. यावेळी अधिकार्यांनी सदर कामे ही पुन्हा उत्कृष्ट दर्जाची केली जातील असे आश्वासन दिले.

पंढरपूर शहरात श्रीविठ्ठल व रुक्मिणी मंदिरासह शहर परिसरातील विविध परिवार देवतांच्या मंदिराची होत असलेली सध्याची कामं ही ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्वाची असुन पंढरपुर शहराची पुरातन ओळख दर्शविणारी आहेत. यासाठी शासनाकडून कोट्यावधी रुपयांचा खर्च होत आहे. येणार्या हजारो पिढ्यांना आदर्शवत ठरावी अशी विठुरायाची पंढरी नगरी पुन्हा एकदा नव्या झळाळीने आपले ऐतिहासिक, पारंपारिक अनमोल असं रुप अवतीर्ण होणार आहे. यासाठी गरज आहे श्रध्देने, निष्ठेनं आणि तत्वानं काम करणार्या अधिकारी व कमर्चार्यांची आणि हे सर्व काम प्रामाणिकपणे चोख करवुन घेणार्या ठेकेदार मंडळींची सुध्दा. परंतु सद्यस्थिती पाहता सध्या चालु असलेल्या विविध कामावर कुणाचाच अंकुश नाही हे स्पष्टपणे जाणवत आहे. जी कामे नको ती होत आहेत आणि जी कामं करायची तीच केली जात नाहीत किंवा निकृष्ट दर्जाची केली जात आहेत. असा आरोप करत या कामाच्या विश्वासार्हतेबाबत गणेश अंकुशराव यांनी चिंता व्यक्त केली आहे.

सर्व नेते मंडळी लोकसभेच्या निवडणुक रणधुमाळीत गुंतलेली असताना घाई–गडबडीने केल्या गेलेल्या अलिकडच्या कांही कामाची पुन्हा एकदा जबाबदार अधिकारी, लोकनेते, समाजसेवक, पत्रकार या सर्वांनी प्रत्यक्ष पाहणी करावी व याची शहानिशा करावी अशी मागणीही यावेळी गणेश अंकुशराव यांनी यावेळी व्यक्त केली. पालकमंत्री बाहेरचे, खासदार बाहेरचे, अधिकारी बाहेरचे अन् मंदिर समितीचे सदस्यही बाहेरचे, इथले सदस्य आहेत ते बिनकामाचे! असे विचित्र चित्रं सध्या मंदिर समितीचे असल्याने या कामाबाबत अनेक




प्रश्नचिन्ह सामान्य पंढरपुरकरांसह वारकरी भाविकांच्या मनात आहेत. तरी मंदिरे समितीच्या अधिकार्यांनी पंढरीतील समाजसेवक, नेतेमंडळी, वारकरी व पत्रकारांची एक संयुक्त बैठक घेऊन आजपर्यंत झालेल्या कामाची व पुढे होणार्या कामाची इत्यंभुत माहितीही तातडीने द्यावी. अन्यथा आम्ही लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन तर करुच पण याबाबत मोठा जनजागर करु. असा इशाराही यावेळी गणेश अंकुशराव यांनी दिला आहे. यावेळी सुरज कांबळे, अर्जुन अभंगराव, धनंजय अधटराव, तात्या अधटराव, बालाजी कोळी, ह.भ.प. गोपाळ महाराज ठाकुर आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. ट